# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक १९.०१.२०२६

**धुळे जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयातील कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील व प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी तक्रारदार यांच्याकडे ९,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **ला. प्र. विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र.** | धुळे शहर पो.स्टे. गुरनं. २४ / २०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दि** | भ्र.प्र. कायदा कलम ७ व १२ प्रमाणे, दि.१९.०१.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | १. इम्रान अब्दुल रशिद अन्सारी, वय ४२ वर्षे, प्रकल्प सहायक (बाहयस्त्रोत), रा. ब्लॉक नं.९,रुम नं.३, म्युनिसिपल कॉलनी, शिवाजी नगर, ८० फुटी रोड, धुळे<br>२. प्रमोद रामराव पाटील, वय ४४ वर्षे, कनिष्ठ लिपीक, रा. प्लॉट नं. १२०, ओसवाल नगर, केंद्रीय विद्यालयजवळ, नगावबारी चौफुली, धुळे<br>**दोन्ही नेमणुक जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे** |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ९,०००/— रुपये |

**थोडक्यात हकिगत :—** तक्रारदार यांचे शालकाचे जातीचे (ओबीसी) प्रमाणपत्र पडताळणी करुन मिळणेकरीता दि.२१.०७.२०२५ रोजी ऑनलाईन अर्ज करुन मुळ अर्ज व आवश्यक ते कागदपत्र जिल्हा जात पडताळणी प्रमाणपत्र समिती, धुळे कार्यालयाकडे जमा केले होते. त्या अनुषंगाने झालेल्या सुनावणी दरम्यान तक्रारदार व त्यांचे शालक यांनी समितीकडे आवश्यक ते कागदपत्र जमा केले होते.

सदर पडताळणी प्रमाणपत्र मिळणेकरीता तक्रारदार हे वेळोवेळी सदर कार्यालयात जावुन पाठपुरावा करीत होते. दरम्यान सदर कार्यालयातील प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी तक्रारदार यांचे शालकाचे जात पडताळणीचे काम करुन देण्याकरीता १२,०००/— रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी ३,०००/— रुपये फोनपे व्दारे घेतले होते. परंतु सुमारे दोन महिने होवुनही जात पडताळणीचे काम न झाल्याने तक्रारदार सदर कार्यालयात गेले असता त्यांची कार्यालयातील कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांचेशी भेट झाली. तेव्हा लिपीक प्रमोद पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या शालकाचे जात पडताळणीचे काम करुन देण्यासाठी १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन पैशांशिवाय काम होणार नाही, असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दि.०८.०१.२०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ९,०००/— रुपये लाचेची मागणी केली. तसेच कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांनी तक्रारदार यांना लाच देण्यास अपप्रेरणा देवुन प्रोत्साहित केले.

त्यानंतर दि.१९.०१.२०२६ रोजी झालेल्या सापळा कारवाई दरम्यान प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांना तक्रारदार यांच्याकडुन ९,०००/— रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| **पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक |
| **तपास अधिकारी** | पदमावती कलाल, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**


**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :— ७७९८१६१०६४